प्रकरण पहिले

# प्रस्तावना

प्रकरण पहिले

# प्रस्तावना

१.१ प्रस्तावना

१.२ संशोधनाची पार्श्वभूमी

१.३ समस्येचे स्पष्टीकरण

१.४ समस्या विधान व पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या

१.५ संशोधनाची उद्दिष्टे

१.६ संशोधन समस्येची गरज व महत्व

१.७ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१.८ समारोप

## १.१ प्रस्तावना

शिक्षण विषयक धोरण आखण्याची प्रक्रिया करण्यात या देशामध्ये स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही करण्यात आलेली दिसून येते. इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा शिक्षण क्षेत्र एक वेगळे आणि महत्वपूर्ण असल्याची जाणिव यावरुन आपल्याला दिसून येते. स्वातंत्र्यापूर्वीपासून व स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते आजपर्यंत सातत्याने शिक्षणासंबंधी विचार करण्यासाठी सातत्याने आयोग नेमण्याची प्रक्रिया घडत आलेली दिसून येते. राष्ट्राच्या अत्यंत महत्वाच्या अशा गरजांचा उल्लेख या आयोगामध्ये करण्यात आल्याचे आढळून येते. वर्धा शिक्षण परिषद (१९३७) विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८-१९४९) माध्यमिक शिक्षण आयोग (१९६४-६६) शिक्षण विषयक राष्ट्रीय धोरण (१९६७) एज्युकेशन फॉर अवर पिपल (१९७८-८७) वरील आयोग व शिक्षण समित्या नेमून शिक्षण विषयक विचार विनिमय करण्यात आला. शिक्षणाविषयी अभ्यास करण्यात आला. या आयोगांमध्ये मूल्य शिक्षण व नैतिक शिक्षणाचा विचार केलेला आहे. स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांनी आपल्या कारकिर्दीत सन १९८६ मध्ये राष्ट्राचे नविन शैक्षणिक धोरण जाहीर केले. यामध्ये शिक्षणाचा आशय व शैक्षणिक प्रक्रिया याचा पुर्नविचार करताना मूल्य शिक्षणाची कल्पना विस्ताराने सांगितलेली आहे. विद्यार्थ्यांच्या नैतिक व भावनिक विकासावर यात भर दिलेला आहे. मूल्याच्या ऱ्हासाबद्दल वाढती चिंता तसेच मूल्याचा होणारा उपहास यामूळे सामाजिक व नैतिक मूल्ये रुजवण्यास शिक्षण समर्थ बनावे यासाठी अभ्यासक्रमाची पुर्नरचना करण्याची गरज प्रतिपादली आहे.

१९८६ च्या शैक्षणिक धोरणाने मूलांच्या मधील मूल्यवृध्दीवर फार मोठा जोर दिलेला आहे. शालेय मूले व तरुण यांच्यामध्ये मूल्यांची जाणिव निर्माण करण्याविषयीचा आग्रह यामध्ये दिसून येतो. मूल्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर यापूर्वी अधिक भर दिला असल्यामुळे मूल्य रुजविण्याकडे फार मोठया प्रमाणात दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. परिणामत: जीवनविषयक मूल्यांचे अवमूल्यन झालेले दिसून येते. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासामध्ये मूल्याचे स्थान महत्वाचे आहे. मूले व तरुणांमध्ये मूल्यांची जोपासना करण्याचे महत्वाचे कार्य हे शाळामधूनच घडून येते. शाळा व महाविद्यालयातील अनेक घटक मूले व तरुणांवर परिणाम करत असतात. त्या घटकामध्ये अभ्यासक्रम शैक्षणिक साहित्य, शालेय परिसरातील मानवी घटक वाचनालय, शाळा ज्या परिसरात असते तेथील समाज अध्यापन, शिक्षक इत्यादी अनेक घटक विद्यार्थ्यांवर परिणाम करीत असतात. या सर्वामध्ये राष्ट्रीय विकासासाठी जो घटक अधिक सहकार्य देतो त्याला आपण चांगला घटक मानतो. त्यालाच आपण चांगले शिक्षण म्हणतो.

शालेय शैक्षणिक प्रक्रियेमध्ये योगदान देणारे अनेक घटक असतात. त्यांचा उल्लेख वर आलेला आहेच. या सर्व घटकापैकी शिक्षक हा घटक अतिशय महत्वाचा आहे. यामध्ये शिक्षकांची समायोजन

क्षमता व त्याचे चारित्र्य अतिशय महत्वाचे असते. शालेय पातळीवर जसा शिक्षक असतो तशीच त्याची आदर्श भूमिक विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी व मूल्यवृध्दीसाठी परिणामकारक ठरते. मूले व तरुण अनुकरणप्रिय असतात. प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या ते शिक्षकांच्या वर्तनाचे अनुकरण करीत असतात. शिक्षकाच्या भूमिकेकडे ते एक आदर्श शिक्षक म्हणून पहात असतात. शिक्षकामधील मूल्य प्रणालीचा मोठा प्रमाणात प्रभाव विद्याथ्र्यांवर पडत असतो. शिक्षकामधील मूल्यांचे संक्रयण मोठया प्रमाणात त्यांच्यामध्ये होत असते. म्हणजेच शिक्षकांच्या आदर्श वर्तनानेच विद्यार्थ्यांमध्ये परिवर्तन होत असते.

सध्या शिकविणे हा व्यवसाय म्हणून जे काम करतात त्यांच्याबाबतीत प्रथम पसंती असण्याची शक्यता नाही. महाविद्यालयातून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणाऱ्या पदवीधराबाबतीत आजच्या सांस्कृतिक वातावरणात अनेक आकर्षणे दाखवितात आणि म्हणून उत्कृष्ठ बुध्दीमत्ता असणारे वरील लोक अधिक प्रतिष्ठित आणि वेतन देणाऱ्या व्यवस्थापन, वैद्यकीय, तंत्रज्ञान क्षेत्रात जातात. अशा अवस्थेत जे शिक्षक म्हणून या व्यवसायाकडे येत असतात ते अगदी पूर्ण मनाने येतीलच असे नाही. यामूळे या व्यवसायामध्ये त्यांचे पूर्ण समायोजन असेलच असे नाही आणि यातूनच त्यांच्या समायोजनविषयक समस्या निर्माण होतात. तरीसुध्दा अध्यापन हा व्यवसाय सर्व व्यवसायामध्ये उत्तम व्यवसाय सर्वश्रेष्ठ व्यवसाय मानला जातो. पण या व्यवसायामधील आजकालची परिस्थिती ही समाधानकारक नसून या व्यवसायातील व्यक्तिविषयी बरीच टिका ऐकावयास मिळते.

प्रस्तुत संशोधिकेला या व्यवसायातत्या शिक्षकांची मूल्यप्रणाली आणि त्या शिक्षकांची समायोजन क्षमता यांचा शोध घ्यावा असा वाटला. आजच्या या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या मूल्य धारणेविषयी अभ्यास करता येईल व त्यातून काही बदल घडवून आणणे शक्य होईल का याचा शोध घेण्याऱ्यासाठी सदरचे संशोधन हाती घेतले आहे की ज्यामुळे शिक्षण प्रक्रियेला थोडेसे योगदान देता येईल.

कोणत्याही राष्ट्राचे माध्यमिक शिक्षण हे त्या राष्ट्राचा कणा असतो. भारताबाबत सुध्दा हीच परिस्थिती आहे. पण भारतातील माध्यमिक शिक्षण हे एकूण शिक्षण प्रणालीचा दुबळा दुवा आहे असे मानले जाते. या दुबळेपणामध्ये सहयोग देणारे दुबळेपणा वाढविणारे हे अनेक घटक आहेत त्यामध्ये शिक्षकांची मूल्यप्रणाली आणि शिक्षकांचे समायोजन हे महत्वाचे घटक असल्यामूळे त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न संशोधिकेने केलेला आहे.

## १.२ संशोधनाची पार्श्वभूमी

शिक्षणातून सुसंस्कारीत विद्यार्थी घडविणे ही काळाची गरज आहे. भारतातील सध्याच्या

परिस्थितीचा विचार करता असे लक्षात येते की रोज मारामाऱ्या, दरोडे, खून अशा शब्दांनी युक्त वाक्ये दररोज वर्तमानपत्रात वाचायला मिळतात. अशा गोष्टीचे प्रमाण कितीतरी प्रमाणात वाढलेले आहे आणि हे प्रमाण कमी व्हायचे असेल तर त्यासाठी प्रभावी साधन म्हणून आपल्याला शिक्षणाकडे पाहावे लागेल व हे शिक्षण देणारे संस्कारक्षम शिक्षक यांची आज मोठया प्रमाणात उणिव दिसून येते.

शिक्षण प्रक्रियेमध्ये अनेक घटकांचा समावेश होतो. उदा. विद्यार्थी, शिक्षक, अध्यापन पध्दती, प्रशासकीय बाबी इ. अनेक घटकामूळे शिक्षण प्रक्रिया पूर्ण होते. या सर्व घटकामध्ये महत्वाचा घटक म्हणजे शिक्षक. संस्कारक्षम विद्यार्थी तयार होण्यामध्ये शिक्षक महत्वाची भूमिका पार पाडत असतात. शिक्षक हे विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या प्रकारची मूल्ये, गुण विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न करतात. पण एकंदरीत सर्व शिक्षण व्यवस्थेमध्ये पाहता आपणास अनेक ठिकाणी या मूल्यांचा ऱ्हास झालेला दिसून येतो. प्रामुख्याने या सर्वांचे खापर शिक्षकावर फोडले जाते. म्हणजेच शाळेमध्ये संस्कार केले जात नाहीत. म्हणजेच शिक्षण व्यवस्थेमध्ये जे शिक्षक म्हणून येतात त्यांच्यामध्ये या व्यवसायासाठी प्रथम पसंती नसते. महाविद्यालयातून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणारे पदवीधरांच्याबाबतीत आजच्या सांस्कृतिक वातावरणात अनेक आकर्षणे दाखवितात आणि म्हणूनच उत्कृष्ठ बुध्दीमत्ता असणारे अनेक पदवीधार लोक अधिक प्रतिष्ठा असणाऱ्या आणि अधिक वेतन देणाऱ्या व्यवस्थापन, वैद्यकीय, तंत्रज्ञान इ. अनेक क्षेत्रात जातात आणि अशा अवस्थेमध्ये उरलेले जे शिक्षक या व्यवसायाकडे येत असतात ते पूर्ण मनाने येतातच असे नाही. ते पूर्ण मनाने या व्यवसायामध्ये येत नाहीत. ते या व्यवसायाशी एकनिष्ठ राहतातच असे नाही. तसेच इतर क्षेत्रामधील प्रतिष्ठा आणि अधिक वेतन यामध्ये आणि शिक्षक व्यवसायामध्ये असणारी प्रतिष्ठा आणि वेतन यातील फरकामुळे शिक्षकी व्यवसाय स्विकारलेले शिक्षक यामध्ये समाधानी असतीलच असे नाही. त्यामुळे या व्यवसायामध्ये त्यांचे पूर्ण समायोजन असेलच असे नाही. यातूनच त्यांच्या समायोजन विषयक समस्या निर्माण होतात. तरी सुध्दा सर्व व्यवसायामध्ये अध्यापन हा व्यवसाय उत्तम व्यवसाय मानला जातो. पण आज या व्यवसायामधील आजकालची परिस्थिती ही समाधानकारक नसून या व्यवसायाविषयी समाजातील सर्व स्तरातून बरीच टीका ऐकावयास मिळते.

कोणत्याही राष्ट्राचा विकास व्हायचा असेल तर तेथील शिक्षण व्यवस्था एकसूत्रित पाहिजे. शिक्षण हेच राष्ट्राच्या विकासाचे सर्वात महत्वाचे माध्यम आहे. त्या शिक्षणाच्या सर्व स्तरामध्ये माध्यमिक शिक्षण हे सर्वात महत्वाचे असते. माध्यमिक शिक्षणालाच राष्ट्राचा कणा असे संबोधले जाते. भारतामध्ये सुध्दा हीच परिस्थिती आहे. भारतातील माध्यमिक शिक्षण हे एकूण शिक्षण प्रणालीमधील दुबळा दुवा आहे असे मानले जाते आणि हा दुबळेपणा वाढविणारे दुबळेपणाला सहयोग देणारे जे अनेक घटक आहेत, शिक्षकामध्ये असणारी मूल्ये आणि शिक्षकांची समायोजन क्षमता हे घटक महत्वाचे आहेत. त्यामुळेच या व्यवसायामधील

शिक्षकांची मूल्यप्रणाली आणि त्यांची समायोजन क्षमता यांचा शोध घ्यावयाचा संशाधिकेने प्रयत्न केलेला आहे.

## १.३ समस्येचे स्पष्टीकरण

माध्यमिक शिक्षण हे शिक्षणाच्या सर्व स्तरावरील महत्वाचा टप्पा आहे. प्राथमिक शिक्षण आणि महाविद्यालयातील शिक्षणाला जोडणारा एक दुवा म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. एकूणच समाजामध्ये विशेषत: तरुण मुले व शालेय विद्यार्थी यांच्यामध्ये होत असलेला मूल्यांचा ऱ्हास यामध्ये शिक्षकांचा वाटा मोठया प्रमाणावर आहे असे समाजातील सर्वच स्तरातील राजकारण्यापासून तत्वज्ञापर्यंत दोष देत असतात. मग शिक्षकी व्यवसाय स्विकारलेले शिक्षक व त्यांच्या मध्ये असलेली नैतिकता, मूल्ये चांगले गुण त्यांच्या या व्यवसायामध्ये असेले समाधान, त्यांची समायोजन क्षमता किती प्रमाणात आहे ते या व्यवसायाशी एकनिष्ठ आहेत काय ? या सर्वांचा शोध घेऊन त्यावर काही उपाय सुचविण्यासाठी हा संशोधनासाठी विषय घेतलेला आहे.

शिक्षण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी अनेक घटकांचा समावेश होतो. त्यामध्ये विद्यार्थी, अध्यापन पध्दती, पाठयपुस्तके, अभ्यासक्रम, शिक्षणाच्या भौतिक सुविधा. या सर्व घटकामध्ये शिक्षक हा घटक महत्वाचा आहे. जर शिक्षक अकार्यक्षम असतील तर ही व्यवस्था पूर्णपणे काम करु शकणार नाही. शिक्षकालाच भावी पिढीतील संस्कारक्षम नागरिक घडवायचे आहेत. त्याच्यावर चांगले मूल्यसंस्कार करावयाचे आहेत. यासाठी जे शिक्षक म्हणून काम करतात ते पूर्ण समाधानी / नैतिक अधिष्ठान असलेले समायोजन क्षमता चांगली असणारे असावयास हवेत तरच ते भावी पिढी संस्कारक्षम घडवतील व देशाचे भविष्य उज्वल करतील. यासाठीच येथे संशोधिकेने शिक्षकामध्ये असणारी मूल्ये आणि त्यांची समायोजन क्षमता यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## १.४ समस्या विधान

**भुदरगड तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांची मूल्ये आणि समायोजन क्षमतेचा अभ्यास**

### पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या

खालील व्याख्या सोहनी शा. कृ. यांनी लिहीलेल्या शैक्षणिक टिपाकोश यामधून घेतलेल्या आहेत.

### भुदरगड तालुका

कोल्हापूर जिल्हयाच्या विभागातील एक विभाग. भुदरगड किल्याचे नाव दिलेले आहे. परंतू गारगोटी येथे मुख्य कार्यालय आहे. १०८ गावांचा हा विभाग आहे.

### माध्यमिक शिक्षक

९ वी ते १० वी या वर्गांना अध्यापन करणारे शिक्षक.

### मूल्य

मूल्य हया शब्दाला इंग्रजी मध्ये VALUE असा प्रतिशब्द आहे.

VALUE या संज्ञेचा अर्थ खालील प्रमाणे आहे.

" Belief about what is desirable or undesirable, values reflect the culture of Society and if the individual accepts a value for him herself it may become a goal"

**संदर्भ :** G. Terry & J. B. Thomas with A. R. Marshall, **International Dictionary of Education, London :** The English Language Book Society and Kogan Page 1979.

### समायोजन

वर्तनाचे समायोजन म्हणजे बदलत्या परिस्थितीनुसार व गरजानुसार वर्तनात समुचित बदल होतो होय.

### अभ्यास

मूळ शब्द अभ्यास = अभि + आस = बसणे या संस्कृत शब्दाचा अर्थ गुरुच्या भोवती किंवा सानिध्यात बसून ज्ञानग्रहण करण्याची प्रचलित पध्दत अभ्यास करण्यासाठी योग्य ती मन:स्थिती विषयाबद्दल गोडी व योग्य ते मार्गदर्शन यांची जरुरी आहे.

-- अभ्यासाचा दुसरा अर्थ सराव असाही आहे.

-- येथे अभ्यास म्हणजे निरीक्षण व सर्वेक्षण यातून गोळा केलेली माहिती व त्याचा लावलेला अन्वयार्थ होय.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनाची खालील उद्दिष्टे ठरविण्यात आली होती.

१. माध्यमिक शिक्षकांच्या मूल्यांचा शोध घेणे.

२. माध्यमिक शिक्षकांच्या समायोजन क्षमतेचा शोध घेणे.

३. माध्यमिक स्त्री शिक्षकांच्या आणि पुरुष शिक्षकांच्या मूल्यांची तुलना करणे.

४. माध्यमिक स्त्री शिक्षकांच्या आणि पुरुष शिक्षकांच्या समायोजन क्षमतांची तुलना करणे.

## १.६ संशोधन समस्येचे महत्व व गरज

शिक्षण प्रक्रियेमध्ये योगदान देणारे जे घटक आहेत त्यामध्ये प्रामुख्याने महत्वाचा घटक म्हणजे शिक्षक. शिक्षणाचा उद्‌देश केवळ ज्ञान देणे नसुन संस्कार करणे आहे. शिक्षण म्हणजे वळण. ते वळण लावण्याचे काम शिक्षकच करु शकतात. यासाठी शिक्षकाची समायोजन क्षमता व चारित्र्य निश्चितच महत्वाचे आहे. शालेय पातळीवर जसा शिक्षक महत्वाचा असतो, तसेच त्याची आदर्श भूमिका विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी व मूल्यवृध्दीसाठी परिणामकारक ठरते. विद्यार्थी हे अनुकरणप्रिय असतात. प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या ते शिक्षकांचे वर्तनाचे अनुकरण करीत असतात. शिक्षकांच्या भूमिकेकडे ते एक आदर्श शिक्षक म्हणून पहात असतात. शिक्षकामधील मूल्यप्रणालीचा मोठा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडत असतो. शिक्षकामधील मूल्यांचे संक्रमण विद्यार्थ्यांमध्ये होत असतो. यासाठी शिक्षकाचे वर्तन आदर्श असावे. त्यासाठीच संशोधिकेला माध्यमिक शिक्षकांची मूल्ये तपासणे गरजेचे वाटले. तसेच सद्य परिस्थितीत शिक्षक हे शिक्षकी व्यवसायाकडे पूर्ण मनाने येत नाहीत. महाविद्यालयातून उत्तीर्ण होउन बाहेर पडणाऱ्या पदवीधराबाबतीत आजच्या सांस्कृतिक वातावरणामध्ये अनेक आकर्षणे आहेत. उत्कृष्ठ बुध्दीमत्ता असणारे लोक अधिक प्रतिष्ठीत व अधिक वेतन देणाऱ्या व्यवस्थापन वैद्यकीय, तंत्रज्ञान इ. क्षेत्राकडे जातात आणि अशा अवस्थेत जे शिक्षकी व्यवसायाकडे येत असतात ते पूर्ण मनाने येतीलच असे नाही. व्यवसायामध्ये समाधानी असतील असे नाही. यातूनच त्यांच्या समायोजन विषयक समस्या निर्माण होतात. म्हणजेच इतर व्यवसायाप्रमाणेच शिक्षकी पेशामध्ये अनेक प्रकारच्या समस्या उद्‌भवतात यामध्ये शिक्षकांचे इतर सहकाऱ्यांशी संबंध, त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या तसेच त्यांच्या व्यक्तिगत जीवनामध्ये निर्माण होणाऱ्या समस्या याचा परिणाम त्यांच्या अध्यापनावर होत असतो.

थोडक्यात म्हणावयाचे झाले तर स्वत:च्या व्यक्तीमत्वाची ओळख किंवा स्वत:ची ओळख कारण या ओळखीशिवाय त्या व्यक्तींची व्यावसायिक कार्यक्षमता वाढूच शकत नाही किंवा त्याची व्यवसायातील आवड किंवा विशेष अभिरुची निर्माण होत नाही. हे संशोधन करण्यापाठीमागचा उद्‌देश म्हणजेच शिक्षकांच्या व्यक्तीमत्वाच्या वैशिष्ठयांचा अभ्यास त्यांच्या व्यावसायिक समाधानतेचा अभ्यास वरील बाबीच्या संशोधनामध्ये कमतरता आढळून येते. त्यामुळेच या क्षेत्रामध्ये संशोधन करण्याची गरज वाटते.

वरील चर्चेवरुन असे स्पष्ट होते की, शिक्षकांची समायोजन क्षमता अत्यंत महत्वाची असते. कारण तीच शिक्षकांच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ करीत असते. पण आजच्या युगात अगदी रस्त्यावरच्या माणसापासून ते एखाद्या राज्यकर्त्यापर्यंत किंवा शिक्षण तज्ञापर्यंत शिक्षणाचा दर्जा खालावल्याची चर्चा करताना दिसून येतात. असे म्हटले जाते की, शिक्षक हे उद्याची भावी पिढी हीच खरी देशाची संपत्ती आहे आणि यामध्ये शिक्षकाचा वाटा महत्वाचा असतो. पण या गोष्टीचा कोणीही आज विचार करताना दिसून

येत नाही. अध्ययन, अध्यापन, साहित्य, शिक्षकाची अभिरुची, त्यांची कौशल्ये आणि समायोजन क्षमता या गोष्टीमध्ये गुणात्मक सुधारणा होण्यासाठी आणि शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी यामध्ये संशोधन करणे गरजेचे आहे.

## १.७ संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

संशोधन समस्येचा जेव्हा तात्विक पातळीवर विचार करतो त्यावेळेस तो समस्येचा समग्र व व्यापक विचार करीत असतो. प्रत्यक्ष संशोधन हाती घेताना मात्र इतक्या व्यापक प्रमाणात संशोधन हाती घेणे वैयक्तिक पातळीवर शक्य नसते. समस्येचे व्यापक विश्लेषण हे केवळ पार्श्वभूमी म्हणून उपयोगी पडत असते. तथापि, संशोधिकेला आपल्या संशोधनाच्या सीमारेषा सुस्पष्ट कराव्या लागतात. त्यादृष्टीने प्रस्तुत संशोधन समस्येची व्याप्ती व मर्यादा पुढीलप्रमाणे आहे :

१. प्रस्तुत संशोधन हे कोल्हापूर जिल्हयातील भुदरगड तालुक्यातील मान्यताप्राप्त शाळांमधील माध्यमिक शिक्षकांच्यापुरते मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शिक्षकांच्या सहा प्रकारच्या मूल्यांचा अभ्यास केला जाणार आहे. त्यामध्ये शिक्षकांचे आर्थिक, सामाजिक, राजनैतिक, सैध्दांतिक, सौंदर्यविषयक व धार्मिक मूल्यांचा, त्याचबरोबर प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षकांच्या समायोजन क्षमतांचा ही अभ्यास केला जाणार आहे. यामध्ये पाच समायोजनक्षमता येतात. त्या पुढील प्रमाणे आहेत :

   १. शालेय व सर्वसामान्य वातावरण क्षमता.
   २. सामाजिक, मानसिक व भौतिक समायोजन क्षमता.
   ३. व्यावसायिक संबंध समायोजन क्षमता.
   ४. व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता.
   ५. आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमता.

३. वरीलप्रमाणे प्रस्तुत संशोधन हे शिक्षकांच्या सहा मूल्यांची व पाच समायोजन क्षमता पुरतेच मर्यादित आहे.

## समारोप

प्रस्तुत संशोधनात संशोधनाची पार्श्वभूमी, समस्या, विधान, समस्येचे स्पष्टीकरण, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन समस्येचे महत्व व गरज, संशोधन समस्येची व्याप्ती व मर्यादा या मुद्दयांची सविस्तर चर्चा केली आहे. पुढील प्रकरणात संबंधित साहित्याचा आढावा घेतला आहे.